
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय आठ वा.
दा. क्र. १०६८८

## मुलांचे मनोरंजन

# पंडित नेहरूंच्या छोट्या गोष्टी

घोरपडे-गोंधळेकर



व्हीनस बुक स्टॉल : पुणें २

१०८८८
३८११८

मुलांचें मनोरंजन : क्र. ५

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. १०८८८ नों. दि.

भाग १ ला



# मोठ्या नेहरूंच्या छोट्या गोष्टी

घोरपडे-गोंधळेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ३८११८
विभाग बा
क्रमांक ३७५७
नों. दि.
वाचनालय शाखा

प्रथमावृत्ति ] १९६४ [ किंमत ८० पैसे

व्हीनस बुक स्टॉल : पुणें २.

प्रकाशक :
सौ. सुलोचना लिमये
एम्. ए
व्हीनस बुक स्टॉल,
अप्पा बळवंत चौक : पुणे २.

मुद्रक .
ज. ग. जोशी,
जनार्दन प्रेस,
३९४ सदाशिव पुणे ४

# या पुस्तकांत काय वाचाल ?


| | | |
|---|---|---|
| १. | नेहरू 'नेहरू' कसे झाले ? ... ... | ५ |
| २. | नेहरूंचें शिक्षण व त्यांचें भाग्य ... ... | ६ |
| ३. | नेहरूंचा संताप, आनंद नि आदरभाव .... | ७ |
| ४. | 'बाबा रक्त पीत आहेत !'... ... | ८ |
| ५. | नेहरूंची अगदीं पहिली आठवण ... | १० |
| ६. | 'संतापी माणूस'! ... ... | ११ |
| ७. | नेहरूंच्या विश्वासाचें ठिकाण ... ... | १२ |
| ८. | नेहरूंची आई ! ... ... ... | १३ |
| ९. | धर्माचा नेहरूंच्या मनावरील परिणाम ! ... | १४ |
| १०. | नेहरूंची तक्रार ! ... ... ... | १५ |
| ११. | एक लहानसा प्रसंग ! ... ... | १७ |
| १२. | नेहरूंना डॉक्टरांचा राग आला ! ... | १८ |
| १३. | नेहरूंचे नवे शिक्षक ... ... | १९ |
| १४. | नेहरू इंग्लंडला चालले ... ... | २० |
| १५. | नेहरूंचा हॅरो येथील विद्यालयांत प्रवेश ... | २१ |
| १६. | नेहरूंनीं हॅरोचा निरोप घेतला ! ... | २२ |
| १७. | केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजांत प्रवेश ... | २४ |
| १८. | नेहरूंनी केंब्रिज सोडलें ... ... | २५ |
| १९. | नेहरू थोडक्यांत बचावले ... ... | २६ |
| २०. | नेहरू बॅरिस्टर कसे झाले ? ... ... | २८ |
| २१. | नेहरूंना जीवनाचा वीट येऊं लागला ... | २९ |
| २२. | नेहरूंचें चुंबन घेतलें ! ... .... | ३० |
| २३. | नेहरू गांधीजींना भेटले ... ... | ३२ |
| २४. | नेहरूंचें लग्न व हिंदुस्थानचें नंदनवन ... | ३३ |
| २५. | नेहरूंचे वडील जमिनीवर निजले ! ... | ३४ |
| २६. | नेहरूंच्या मनाला मोठा धक्का बसला ! ... | ३६ |
| २७. | नेहरूंची हकालपट्टी झाली ! ... | ३७ |
| २८. | मी हा असाच पुढे जात राहणार ! ... | ३८ |
| २९. | नेहरू असहकारी झाले ! ... ... | ४० |



## १ : : नेहरू 'नेहरू' कसे झाले ?

नेहरू मूळचे काश्मिरांतले. दोनशेंहून अधिक वर्षांपूर्वी त्यांचे वाडवडील काश्मीरच्या खोऱ्यांतून निघून पैसा आणि नांव कमविण्यासाठीं खालच्या समृद्ध प्रदेशांत उतरले. त्या वेळीं औरंगजेब पगंबरवासी होऊन मोगल साम्राज्याची इमारत ढांसळूं लागली होती. दिल्लीश्वराच्या गादीवर फरुखसिअर बसला होता. काश्मीर सोडून दक्षिणेकडे आलेल्या त्यांच्या प्रथम पूर्वजाचें नांव राजकौल. संस्कृत व पर्शियन भाषापंडित म्हणून त्यांचें नांव काश्मिरांत बरेंच गाजलें होतें. फरुखसिअरनें काश्मीरला भेट दिली तेव्हां राजकौल फरुखसिअरच्या डोळयांत भरला आणि १७१६ च्या सुमारास बहुशः बादशहाच्या सांगण्यावरूनच कौल-कुटुंब दिल्लीस वास्तव्यासाठीं आलें. एका कालव्याच्या कांठीं राहत्या घरासह एक जहागीर राजकौल यास देण्यांत आली. कालव्याला 'नहर' असा शब्द आहे. तेव्हा कालव्याच्या कांठीं राहणारे म्हणून "नेहरू" असें अभिधान या घराण्याला मिळालें !

अनुक्रम
विभाग:
क्रमांक
नों दि.

## २ : : नेहरूंचें शिक्षण व त्यांचें भाग्य !

नेहरूंच्या दोघी बहिणी त्यांच्याहून पुष्कळच लहान आहेत आणि ह्या तिघां भावंडांत बऱ्याच वर्षांचें अंतर आहे, त्यामुळें बालपणांत नेहरूंना त्यांच्या बरोबरीचे सवंगडी लाभले नाहींत व ते थोडे एकलकोंडे असेच वाढले !

शाळेंतल्या वर्गबंधूंची गट्टी जमावी तर तेंहि घडलें नाहीं. कारण बालकमंदिर अथवा प्राथमिक शाळा या संस्थांत त्यांना कधींच पाठविण्यांत आलें नाहीं. त्यांना शिक्षण देण्याचें काम खासगी शिक्षक आणि शिक्षकिणी यांच्यावरच सोंपविलेलें होतें ! !

तथापि त्यांच्या घरीं माणसांची वाण नव्हती. पण त्यांचीं चुलत भावंडें पुष्कळच वडील. तीं हायस्कुलांतून आणि विश्वविद्यालयांतून शिकत होतीं. तेव्हां त्यांच्या कामकाजांत अगर खेळांत भाग घेण्यास ते फार लहान आहेत असें त्यांना वाटे. तात्पर्य इतकेंच कीं, कुटुंबांत माणसें जरी पुष्कळ होतीं तरी त्यांना आपला एकांतवासच घडे, आणि स्वतःचेच मनसुबे स्वतः रचावे आणि एकट्यानेंच खेळ खेळावे असेंच भाग्य त्यांच्या वांटणीला येई ! ! !

# ३ : : नेहरूंचा संताप, आनंद नि आदरभाव !


धकाधकीचे प्रसंग अथवा दुसऱ्या कांहीं उलाढाली नेहरूंच्या आयुष्यांत घडल्या नाहींत. आयुष्याचा प्रवाह अगदीं संथपणें वाहात होता. त्यांचीं चुलत भावंडें मोठमोठ्या गोष्टी बोलत त्या सगळ्याच त्यांना समजत नसत !

इंग्रजांच्या उद्दाम स्वभावाविषयीं आणि अपमानकारक वर्तणुकीविषयीं पुष्कळ वेळां बोलणीं चालत आणि मूग गिळून स्वस्थ न बसतां प्रत्येक हिंदी मनुष्यानें याचा छातीठोकपणानें प्रतिकार केला पाहिजे–असेंहि मत प्रदर्शित होत असें. इंग्रज व हिंदी लोकांमधली झगड्याची उदाहरणें नेहमीं घडत आणि त्यांवर मोकळेपणानें चर्चाहि चाले.

उद्दामपणें वागणाऱ्या राज्यकर्त्यांचा नेहरूंना मनस्वी संताप येई आणि एखाद्या हिंदी इसमानें ठोशासठोसा लगावल्याचें समजलें कीं त्यांना आनंद होत असे !

परकीय राज्यकर्त्यांची राजवट आणि वर्तणूक यांची नेहरूंना फार चीड येई; पण वैयक्तिक इंग्रज माणसाबद्दल त्यांच्या मनांत द्वेषभाव उपजल्याचें त्यांना तरी आठवत नसे. इंग्रज बाया त्यांच्या संगोपनासाठीं ठेवण्यांत आलेल्या होत्या, आणि कधीं कधीं त्यांच्या वडिलांकडे त्यांचे इंग्रज स्नेही भेटावयास येत असत. इंग्रजांचेविषयीं नेहरूंच्या मनांत आदरभावच होता.

# ४ : : बाबा रक्त पीत आहेत !



सायंकाळीं बहुधा खूपच मित्रमंडळी नेहरूंच्या वडिलांना भेटण्यासाठीं येत आणि दिवसभराच्या दगदगीनंतर जरा आराम करण्याच्या मनोवृत्तींत ते असले कीं त्यांच्या तिमजली हंसण्यानें त्यांचें घर दणाणून जात असे. त्यांचें हंसणें सर्व अलाहाबादेंत प्रसिद्ध होतें.

क्वचित् प्रसंगीं पडद्याआडून नेहरू वडिलांच्याकडे आणि त्यांच्या मित्रपरिवाराकडे दृष्टि टाकीत असत. हेतु हा कीं हीं बडीं प्रस्थें एकमेकाशीं बोलतात तरी काय तें समजलें तर पहावें.

टेहळणी करतांना पकडले गेले तर त्यांना बाहेर खेचण्यांत येई आणि भीतीनें गांगरलेल्या स्थितींतच वडिलांच्या मांडीवर त्यांना थोडा वेळ बसविण्यांत येई !

एकदां नेहरूंनीं त्यांना कोणतें तरी लाल मद्य पितांना पाहिलें. व्हिस्की त्यांच्या परिचयाची होती; कारण ती पीत असतांना वडिलांना व त्यांच्या मित्रांना त्यांनीं पाहिलेलें होतें. परंतु हें नवें लाल लाल पेय पाहून त्यांना फार भीति वाटली आणि ‘ बाबा रक्त पीत आहेत ’ असें सांगण्यासाठीं ते आईकडे धांवतच गेले ! !

# ५ : : नेहरूंची अगदीं पहिली आठवण !

नेहरूंच्या अगदीं पहिल्या आठवणीपैकीं एक आठवण त्यांच्या वडिलांच्या रागासंबंधींचीच आहे; कारण तेच त्यांत होरपळून निघालेले होते ! नेहरू तेव्हां पांच-सहा वर्षांचे असतील. एके दिवशीं त्यांना वडिलांच्या टेबलावर दोन फाउन्टन् पेन्स् आढळलीं. हावरेपणानें ते त्यांच्याकडे पहात राहिले. मनांत विचार आला कीं वडिलांना एकाच वेळीं दोन फाउन्टन् पेन्स् लागण्याचा कांहीं संभव नाहीं. म्हणून त्यांनीं त्यांतलें एक पेन लांबवलें !

नंतर त्यांना कळून आलें कीं, गहाळ फाउन्टन् पेनचा तपास कसोशीनें चालला आहे. त्यांच्या हातून घडलेल्या कृत्याच्या विचारानें ते अगदीं भेदरून गेले, पण ते कबूल झाले नाहींत ! !

शेवटीं पेन सांपडलें आणि त्यांचा गुन्हा सर्वांना जाहीर झाला. वडील संतापानें लाल झाले आणि त्यांनीं नेहरूंना यथास्थित चोप दिला ! मानहानीमुळें वाटणाऱ्या शरमेनें आणि माराच्या दुःखामुळें अगदीं मूढ बनून ते आईला जाऊन बिलगले ! !

मग किती दिवस तरी मारानें हुळहुळ्या झालेल्या आणि भीतीनें थरथरणाऱ्या त्यांच्या लहानग्या शरिरावर मलमपट्ट्या चालल्या होत्या ! ! !

## ६ : : 'संतापी माणूस'!

वडिलांच्याबद्दल नेहरूंना निस्सीम आदर होता. ते म्हणजे शक्ति, शौर्य आणि बुद्धिमत्ता यांचे साक्षात् पुतळे आहेत अशी त्यांची कल्पना असे. त्यांनीं पाहिलेल्या लोकां-पेक्षां ते त्यांना किती तरी श्रेष्ठ वाटत.

मनांतल्यामनांत दडवून ठेवलेली त्यांची आशा म्हणजे मोठेपणीं आपण वडिलांप्रमाणें व्हावें. त्यांच्याबद्दल त्यांना अतिशय आदर व प्रेम वाटे. पण त्याचबरोबर त्यांची त्यांना भीतीहि वाटे. नोकरां-चाकरांवर डाफरतांना त्यांनीं त्यांना पाहिलें होते. त्या वेळीं वडील भारी उग्र दिसत, आणि त्यांचें शरीर भीतीनें कांपूं लागे! नोकर चाकरांना वागविण्याच्या त्यांच्या तऱ्हेबद्दल त्यांना वाटणाऱ्या संतापाचीहि त्यांत भर पडत असे. त्यांचा राग खरोखरच भयंकर होता, आणि नंतरच्या काळांतहि त्यांच्या रागाची बरोबरी करील असा संतापी माणूस नेहरूंच्या पाहण्यांत आलेला नव्हता!

पण सुदैवान त्यांच्या वडिलांची विनोदबुद्धि मोठी जागृत होती व त्यांच्या इच्छाशक्तीचें बळहि दांडगें होतें. त्यामुळें बहुतेक प्रसंगीं ते आपला क्रोध आवरीत असत. जसजसें त्यांचें वय होत गेलें तसतसा त्यांचा संयमहि वाढला, आणि पूर्वीप्रमाणें शंकराचा तृतीय नेत्र उघडण्याचे प्रसंग फारच क्वचित् येऊं लागले!!

## ७ : : नेहरूंच्या विश्वासाचें ठिकाण–

लहानपणीं नेहरूंच्या विश्वासाचें दुसरे ठिकाण म्हणजे त्यांच्या वडिलांचे शिक्षक मुनशी मुबारक अलि. बदाऊन येथील एका सुखवस्तु कुटुंबापैकीं ते एक गृहस्थ होते. १८५७ सालच्या बंडांत त्या घराण्याची धूळधाण झाली. दु:खानुभवानें त्यांचा स्वभाव सौम्य झाला होता. ते सर्वांशींच आणि विशेषत: लहान मुलांशीं मोठ्या ममताळूपणानें वागत. नेहरू अडचणींत सांपडले अगर त्यांचें मन कष्टी झालें कीं त्यांना त्यांच्यापाशीं हटकून आसरा मिळावयाचाच !

त्यांची भव्य मूर्ति व पांढरी शुभ्र दाढी पाहिली कीं नेहरूंना वाटे हे बहुत पुरातन गृहस्थ असावेत. यांच्यापाशीं जुन्या विद्येचा भरपूर सांठा असला पाहिजे. नेहरू त्यांना अगदीं बिलगून बसत आणि अरेबियन् नाइट्स्मधल्या अगर दुसऱ्या पुस्तकांतील गोष्टी अथवा १८५७ सालच्या प्रसंगांचीं वर्णनें ते सांगू लागले कीं, ते आश्चर्यचकित दृष्टीनें तासन्तास ऐकत राहात असत. नंतर कित्येक वर्षांनीं नेहरू मोठे झाल्यावर ‘मुनशीजी’ वारले !

त्यांची स्मृति मात्र नेहरूंनीं मोठ्या प्रेमानें एखाद्या ठव्याप्रमाणें जतन केलेली होती ! !

## ८ : : नेहरूंची आई !

वडिलांनीं नेहरूंना दिलेल्या शिक्षेबद्दल त्यांनीं त्यांच्यावर आकस धरलेला त्यांना आठवत नव्हता. झाली ती शिक्षा जरा कडक पण योग्य झाली असें त्यांना वाटलें असावें. परंतु वडलांबद्दल वाटणारें प्रेम व आदर हीं जरी पूर्वीं-प्रमाणेंच कायम होतीं तरी त्यांत भीतीचा अंश आला !

आईविषयीं मात्र तसें नव्हतें. तिची भीति नेहरूंना मुळींच वाटत नसे, कारण त्यांची खात्रीच असे कीं, त्यांनीं कांहीं जरी केलें तरी ती गयच करणार ! नेहरूंवर त्यांचें निरतिशय आणि अखंड प्रेम असल्यामुळें तेच त्यांच्यावर डोळे वटारीत असत ! वडिलांपेक्षां त्यांच्याशीच त्यांचा संबंध अधिक येई त्यामुळेंहि त्यांना त्याच अधिक जवळच्या वाटत. आणि ज्या गोष्टी वडिलांपाशीं बोलाव्या असें स्वप्नांतहि वाटणार नाहीं त्या आईपाशीं ते बोलत असत.

त्या नाजूक, ठेंगण्या बांध्याच्या अशा होत्या. नेहरू लवकरच त्यांच्याइतके उंच झाले, तेव्हां आपण त्यांच्या बरोबरीचे आहोंत असें त्यांना वाटूं लागलें ! त्यांच्या सौंदर्याचा त्यांना अभिमान वाटे, आणि त्यांच्या असाधारण सुंदर आणि चिमुकल्या हातांपायांकडे पाहिलें कीं त्यांना आनंद होई ! !

## ९ : : धर्माचा नेहरूंच्या मनावरील परिणाम !

धर्माविषयींच्या नेहरूंच्या कल्पना फारच अंधुक होत्या. पण त्यांना वाटे कीं धर्म म्हणजे बायकांचें खातें ! कुटुंबांतल्या बायकांचीं अनेक प्रकारचीं व्रतें वैकल्यें आणि पूजाअर्चा चालत, तेव्हां कुटुंबांतल्या वडीलधाऱ्या पुरुष-मंडळींच्या बेपर्वाईची नक्कल करण्याचा नेहरू जरी थोडाफार प्रयत्न करीत असले तरी त्यांना त्यांत मौज वाटे !


हिंदु पुराणें, रामायण, महाभारतासारखीं महाकाव्यें यांतल्या कथाहि त्यांची आई अगर काकू त्यांना सांगत त्या त्यांनीं ऐकल्या होत्या. त्यामुळें हिंदी पुराणें आणि आख्यायिका यांच्याबद्दल त्यांनाहि बरेंच ज्ञान झालें.

आईबरोबर अथवा काकूबरोबर ते केव्हांकेव्हां गंगेव स्नानासहि जात असत. कधीं अलाहाबादेंतल्या, बनारसमधल्या अथवा इतर ठिकाणच्या देवळांतूनहि ते जात होते, तर कधीं धार्मिक म्हणून प्रसिद्ध असलेल्या एखाद्या संन्याशाच्या दर्शनालाहि बाहेर पडत होते.

पण त्या सर्वांचा त्यांच्या मनावर फारच थोडा परिणाम झाला !

## १० : : नेहरूंची तक्रार !-

सर्व समारंभांत वर्षाकांठीं एकदांच येणाऱ्या एका समारंभाची नेहरूंना विशेष आवड वाटे, कारण त्यांत मुख्य ठिकाणीं त्यांची योजना होत असे. तो समारंभ म्हणजे नेहरूंचा वाढदिवस ! त्या दिवशीं त्यांची फार गडबड उडायची. अगदीं सकाळींच त्यांना एका भल्या मोठ्या ताजव्यांत बसवीत व दुसऱ्या ताजव्यांत गव्हाच्या मोटळ्या आणि इतर कांहीं जिन्नस घालून त्यांचें वजन करण्यांत येत असे. नंतर ते जिन्नस गोरगरिबांना वांटून टाकीत.



'तुला' झाली कीं ते नवा पोषाख चढवीत असत. मग त्यांना देणग्या व बक्षिसें मिळत. उपरांत भोजनाचा थाट उडे. या प्रसंगीं नेहरूंची मिजास म्हणजे राजाची!

नेहरूंची मुख्य तक्रार एवढीच कीं, त्यांचा वाढदिवस फार अंतरा अंतरानें येई. त्यांचे वाढदिवस अधिक वेळ करण्यांत यावेत अशी चळवळ देखील त्यांनीं सुरू केली होती!

## ११ : : एक लहानसा प्रसंग !–

नेहरू बहुधा त्या वेळीं सात आठ वर्षांचे असतील. ते रोज घोडा फिरविण्यासाठीं जात असत. त्यांच्याबरोबर अलाहाबादच्या घोडदळापैकीं एक स्वार देण्यांत येई.

एके दिवशीं संध्याकाळीं ते घोड्यावरून पडले आणि अर्धवट अरब अवलादीचा त्यांचा सुंदर घोडा रिकाम्या खोगिरानेंच घरीं आला ! त्यांच्या वडिलांचेकडे टेनिस-साठीं लोक जमले होते तेथें मोठी गडबड उडाली !

खेळासाठीं जमलेले समस्त लोक निरनिराळ्या प्रकारच्या वाहनांत बसून नेहरूंच्या शोधासाठीं बाहेर पडले. एक मोठी मिरवणूकच निघाली म्हणाना !

वाटेंतच ते नेहरूंना भेटले आणि मग त्यांचें असें कौतुक झाले कीं जणूं कांहीं ते लढाईच मारून आले होते ! !

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

## १२ : : नेहरूंना डॉक्टरांचा राग आला !

प्रत्येकाला बहीण भाऊ असतांना नेहरूंना मात्र ते नसावेत याचें त्यांना मनांतून फार वाईट वाटे ! मात्र आतां विजयालक्ष्मींच्या खेपेला आपल्याला एक तरी भाऊ अगर बहीण सत्तेची अशी मिळणार आहे हें समजून आल्यावर त्यांचा आनंद गगनांत मावेना !

व्हरांड्यांत उत्कंठेनें ते वाट पहात उभे राहिले होते, त्याची त्यांना चांगली आठवण होती. डॉक्टरांनीं त्यांना ही बातमी सांगितली आणि बहुधा विनोदानेंच म्हणाले कीं मुलगा झाला नाहीं हें बरें झालें, त्यानें मिळकतींतला वांटा मागितला असता !

असले अभद्र विचार आपल्या मनांत येण्याइतके आपण कोत्या बुद्धीचे आहों असें एखाद्याला वाटावें ही गोष्ट नेहरूंच्या मनाला फार लागून राहिली आणि त्यांना डॉक्टरांचा राग आला !

## १३ : : नेहरूंचे नवे शिक्षक

नेहरू ११ वर्षांचे असतांना त्यांच्यासाठीं एका नव्या शिक्षकाची योजना झाली. त्यांचें नांव फर्डिनंड टी. ब्रुक्स. त्यांच्या हवालीं नेहरूंना करण्यांत आलें. ते निष्ठावंत थिऑसॉफिस्ट होते. ते जवळजवळ तीन वर्षें त्यांच्यापाशीं राहिले. त्यांची नेहरूवर बरीच छाप पडली.

नेहरूंचे त्यावेळचे दुसरे शिक्षक म्हणजे हिंदी संस्कृत शिकविणारे पंडित. बिचारा म्हातारा त्यांना शिकविण्याचा खूप प्रयत्न करी. पण कित्येक वर्षें मेहनत घेऊनहि नेहरूंच्या पदरीं त्याला फारसें ज्ञान बांधतां आलें नाहीं !

नेहरूंना प्राप्त झालेलें ज्ञान इतकें अल्प होतें कीं हॅरो विश्वविद्यालयांत आत्मसात केलेल्या अकटोविकट लॅटिन भाषेच्या जातीशींच त्यांच्या संस्कृत ज्ञानाची तुलना करतां येईल !

दोष नेहरूंचाच होता हें निःसंशय. भाषा त्यांना चटकन् येत नसत आणि व्याकरण तर त्यांना दृष्टीसमोर नको होतें !!

## १४ : : नेहरू इंग्लंडला चालले !

नेहरूंना १४ वें वर्ष लागलें. घरांत अदलाबदल चालली होती. त्यांची वडील चुलत भावंडें उद्योगधंद्याला लागल्यामुळें मूळ घर सोडून बाहेर पडत होतीं, आणि आपलीं बिऱ्हाडें थाटत होतीं ! कांहीं नवे विचार आणि अंधुक कल्पना त्यांच्या डोक्यांत तरंगू लागल्या होत्या, आणि स्त्रियांचे विषयीं निराळे भाव मनांत उद्‌भवत होते. अद्यापि मुलांच्या बरोबरच ते खेळत सवरत असत.

मुलींच्या बरोबर मिसळणें त्यांना जरा कमीपणाचें वाटें; परंतु समारंभाचे निमित्तानें काश्मिरी समाजांत दुर्मिळ नसलेल्या सुंदर मुली एकत्र झाल्या म्हणजे असे प्रसंग येत कीं, एखाद्या कटाक्षानें अगर निसटत्या स्पर्शानें त्यांचें शरीर लहरून जाई !

१९०५ च्या मे महिन्यांत ते १५ वर्षांचे असतांना ते इंग्लंडला जाण्यासाठीं निघाले. त्यांचे वडील, आई, छोटी बहीण आणि ते सगळेच इंग्लंडला चालले होते ! !

# १५ : : नेहरूंचा हॅरो येथील विद्यालयांत प्रवेश

नेहरूंचें वय पंधरा वर्षांचें म्हणजे हॅरो येथें प्रवेश मिळण्यास लागणाऱ्या वयापेक्षां थोडें अधिक होते. तथापि सुदैवानें त्यांना तेथील विद्यालयांत प्रवेश मिळाला.

परकी मंडळींत पूर्वी नेहरू एकेकटे असे कधींच राहिले नव्हते. त्यामुळें त्यांना अगदीं एकलकोंडें वाटूं लागलें व घरची आठवण येऊं लागली. पण ही स्थिति फार वेळ टिकली नाहीं. शालेय जीवनाशीं समरस होण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. काम आणि खेळ यांच्यांत वेळ जाऊं लागला. पण पूर्णपणें समरस होणें त्यांना कधींच जमलें नाहीं. आपण त्यांच्यापैकीं नाहीं असें त्यांना वाटत राही. त्यांनाहि तसेंच वाटत असावें; त्यामुळें नेहरू दूरदूरच असत, परंतु खेळांत मात्र ते मनःपूर्वक भाग घेत असत. त्यांत ते फारसे चमकले नसले तरी ते चुकारपणा करीत नाहींत याविषयीं इतरांची खात्री होती.

हलकें हलकें हॅरो येथील वातावरण त्यांच्या अंगवळणीं पडलें. त्यांना तें स्थान आवडूं लागलें. असें असूनसुद्धां त्यांच्या मनाला वाटें कीं हें जग अपुरें पडत आहे! विश्वविद्यालयाकडे त्यांची दृष्टि लागून राहिली होती!!

## १६ : : नेहरूंनीं हॅरोचा निरोप घेतला !



शाळेंत चांगल्या अभ्यासाबद्दल नेहरूंना ट्रेवेलरॅनची गॅरिबाल्डीवरील पुस्तकें बक्षीस मिळालीं, तीं त्यांना फार पसंत पडलीं, म्हणून त्याच मालेंतील उरलेलीं दोन पुस्तकेंहि खरेदी करून गॅरिबाल्डीचा सर्व वृत्तान्त लक्ष-पूर्वक त्यांनीं वाचून काढला. हिंदुस्थानांत स्वातंत्र्यासाठीं अशींच शौर्याचीं कृत्यें, शर्थीचे लढे चालले आहेत अशीं

चित्रें त्यांच्या डोळ्यासमोर उभीं राहिलीं. त्यांच्या डोक्यांत हिंदुस्थान आणि इटली देश जणूं कांहीं एकजीव झाले होते !

आपल्या कल्पनांच्या विकासाला हॅरो ही फार मर्यादित आणि संकुचित जागा आहे, आपण विश्वविद्यालयाच्या विस्तीर्ण सृष्टींत राहावयास गेले पाहिजे, असें त्यांच्या मनांत येऊं लागले.

या त्यांच्या बेताला अनुमति मिळावी म्हणून त्यांनीं वडिलांचें मन वळविलें आणि दोन वर्षांच्या वास्तव्यानंतर म्हणजे नेहमींपेक्षां पुष्कळच आधीं हॅरोचा निरोप घेतला.

नेहरूंनीं आपखुषीनें हॅरो सोडलें हें खरें; परंतु प्रत्यक्ष वियोगाचा काळ आल्यावर त्यांना दुःख झालें आणि डोळ्यांत अश्रु उभे राहिले ! ! त्यांना त्या जागेचा बराच लळा लागला होता ! ! !

## १७ : : केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजांत प्रवेश !

सतरावें वर्ष संपत आलेलें, १९०७ च्या ऑक्टोबरचा प्रारंभ; अशा वेळीं केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजांत नेहरूंनी प्रवेश केला--विश्वविद्यालयीन विद्यार्थी म्हणून ते जरा फुगून गेले होते !

तीन वर्षें त्यांनीं केंब्रिज येथें काढली. मोठा सुखाचा काळ होता तो ! खूप मित्र, थोडकेसें काम आणि थोडकासा वेळ ! ! बौद्धिक क्षितिज हळूहळू विस्तीर्ण होत चाललें होतें. त्यांचे विषय रसायन शास्त्र, वनस्पति शास्त्र आणि भूस्तर शास्त्र असे होते व त्यांना त्या विषयांची पदवीहि मिळाली ! परंतु त्यांचा व्याप त्या विषयांपुरताच मर्यादित नव्हता. वाङमय, इतिहास, राजकारण, अर्थशास्त्र वगैरे विषयांवरील पुस्तकें ते वाचीत असत.

१९०७ च्या नतर कित्येक वर्षें असंतोषानें व चळवळींनीं हिंदुस्थानचें वातावरण कढत होतें. टिळकांची कामगिरी व त्यांना झालेली अटक, अरविंद घोषांची अटक, बंगालमधील जनतेनें स्वदेशी व बहिष्काराचें स्वीकारलेले व्रत, वगैरे बातम्यांमुळें इंग्लंडांतील हिन्दी लोकांत चैतन्य संचरत होतें. नेहरूसकट बहुतेक सारेजण टिळक पक्षीय होते !

## १८ : : नेहरूंनीं केंब्रिज सोडलें !

१९१० सालीं पदवी घेऊन नेहरूंनीं केंब्रिज सोडलें. त्यांच्या विषयांत त्यांना बेताचेंच यश मिळालें, म्हणजे दुसऱ्या वर्गांत सन्मानपूर्वक ते उत्तीर्ण झाले. नंतरचीं दोन वर्षें त्यांनीं लंडनच्या अंवतीभोंवती काढलीं. कायद्याच्या अभ्यासाकडे फारसा वेळ खर्च होत नसे. बॅरिस्टरीच्या परीक्षेंत विशेष यश अथवा अपयश कांहींच न मिळतां ते सरळ पास होत गेले. बाकीचा वेळ भटकण्यांत, सर्व सामान्य वाङमय वाचण्यांत, फेबिअनांच्या व समाज-वाद्यांच्या कल्पनांशीं पुसट ओळख करून घेण्यांत आणि प्रस्तुत राजकीय चळवळीचे निरीक्षणांत संपून गेला.

आयर्लंडच्या आणि स्त्री मताधिकार चळवळीकडे नेहरूंचे विशेष लक्ष लागलें होतें. सन १९१० च्या उन्हाळ्यांत आयर्लंडांत ते गेले असतां सिनफेन चळवळी-कडे त्यांचें मन आकर्षित झालें. लंडनमध्यें हॅरोंतले जुने मित्र त्यांना भेटले आणि त्यांच्या सहवासानें त्यांना खर्चिक राहणीची चटक लागली !

## १९ : : नेहरू थोडक्यांत बचावले !



१९१० सालीं नॉर्वे देशांत नेहरू गेले असतां ते थोडक्यांत बचावले ! डोंगराळ मुलूख तुडवीत ते चालले होते. मुक्कामास पोंचले ते, अगदी घामाघूम झालेले आणि शिणलेले भागलेले असे पोचले.

त्यांनीं स्नानासाठीं पाणी मागितलें. त्या छोटेखानी खानावळींत अशा प्रकारची मागणी अपूर्वच होती. पाणी तेथें मिळेना. शेजारच्या ओढ्यांत स्नान करा असा सल्ला त्यांना मिळाला !

जवळच्या हिमनदींतून गर्जना करीत खालीं पडणाऱ्या त्या ओढ्याकडे लहानसे टॉवेल घेऊन ते निघाले. नेहरू

पाण्यांत शिरले. पाणी खोल नव्हते पण मनस्वी गार होतें. तळाला पाय ठरत नव्हता, त्यामुळें ते घसरून पडले! गार पाण्यामुळें गात्रें बधिर झालीं. हातापायांवर त्यांचा ताबा राहिला नाहीं. पाय कोठेंच ठरेना. ते झपाट्यानें खालीं वाहात चालले होते. त्यांचा इंग्लिश मित्र कसाबसा बाहेर पडला. कांठा कांठानें धांवत जाऊन शेवटीं त्यानें मोठ्या शर्थीनें त्यांची तंगडी पकडली आणि त्यांना बाहेर खेचलें! मागाहून त्यांना कळलें कीं, खालीं दोन तीनशें याडांवर हाच गिरिप्रवाह एका प्रचंड कड्यावरून खालीं उडी घेत आहे.

## २० : : नेहरू बॅरिस्टर कसे झाले !

पदवीधर झाल्यावर पुढें काय करावयाचें हा नेहरूंपुढें प्रश्न उभा राहिला. त्यांच्यापुढें दोन मार्ग होते; आय्. सी. एस्. किंवा बॅरिस्टर.

ते आय्. सी. एस्. होण्यास त्यांच्या वडिलांचा विरोध होता. कारण ते त्यांचे एकुलते एक चिरंजीव होते व ते जर सरकारी नोकरींत शिरले तर ते त्यांना दुरावतील अशी त्यांना भीति वाटत होती. पुत्रप्रेमाला बळी पडून अखेर त्यांच्या वडिलांनीं त्यांना आय्. सी. एस्. पासून परावृत्त केलें व त्यांनी बॅरिस्टर व्हावें असें ठरविलें. अखेर त्यांच्या म्हणण्याप्रमाणें नेहरूंनीं बॅरिस्टरीच्या अभ्यासासाठीं 'इन्नर टेंपल्' मध्यें आपलें नांव दाखल केलें !

१९१२ सालीं नेहरू बॅरिस्टर झाले आणि त्याच वर्षाच्या हेमंत ऋतूंत हिंदुस्थानला परत आले. इंग्लंडांत त्यांनीं सात वर्षें घालविलीं. मध्यंतरीं सुटींत तें दोनदां स्वदेशीं येऊन गेले होते.

पण आतां आले ते कायम वास्तव्य करण्यासाठीं. मुंबईच्या धक्क्यावर त्यांनीं पाय ठेवला तेव्हां त्यांच्याजवळ वाखाणण्यासारखें कांहीं नव्हतें !

## २१ : : नेहरूंना जीवनाचा वीट येऊं लागला !


हिंदुस्थानांत आल्यावर नेहरूंनीं अलाहाबादच्या हाय॰कोर्टांत वकिली सुरू केली. तें काम त्यांना थोडेंबहुत आवडत असे; पण हळहळू त्यांच्या दर्जाच्या इतर लोकांच्या संगतींत ते जें जीवन कं ीत होते तें त्यांना नीरस भासूं लागलें !

त्यांच्या भोंवतालच्या वातावरणांत त्यांना समाधान लाभत नव्हतें, त्याचें कारण त्यांना मिळालेलें अर्धबाटगें अथवा भेसळीचें म्हणा–शिक्षण हेंच असावें. त्यांच्या इंग्लंडांतील सात वर्षांच्या वास्तव्यामुळें त्यांच्या अंगीं ज्या संवयी व कल्पना मुरल्या होत्या त्यांना अनुरूप अशी परिस्थिति भींवतीं त्यांना आढळेना.

सुदैवानें त्यांच्या घरचें वातावरण बरेंच अनुकूल होतें. त्यामुळें तितकेंसें जड गेलें नाहीं; पण तेवढ्यानें भागेना. उरलासुरला वेळ घालवायला कोर्टाचें ग्रंथालय व क्लब होताच. पण तेथें तेचतेच लोक भेटावयाचे. तेचतेच विषय खलावयाचे, नेहमींचाच काथ्याकूट सुरू असावयाचा आणि तो देखील कायदे–कानूसंबंधीं बौद्धिक चालना माणसाला मिळेल असें वातावरण तेथें नव्हतेंच नव्हतें ! त्यामुळें नेहरूंना जीवनाचा वीट येऊं लागला ! !

## २२ : : नेहरूंचें चुंबन घेतलें !–

महायुद्धांतल्या प्रारंभींच्या काळांत नेहरूंनीं केलेलीं राजकीय व सामाजिक कार्यें फारच अल्प होतीं. सार्वजनिक सभांतून ते कधींच बोलत नसत. जाहीर भाषण करण्याची त्यांना भीति वाटे. शिवाय त्यांची इच्छा अशी होती कीं, जाहीर भाषणें इंग्रजींतून न होतां हिंदींतून व्हावींत. पण फार वेळ हिंदींतून बोलणें जमेल कीं नाहीं याची त्यांना जबरदस्त शंका होती.



अलाहाबादेस अगदीं पहिलें भाषण करण्यास नेहरू तयार झाले तेव्हांचा एक प्रसंग वर्णन करण्यासारखा आहे.

ही बहुधा १९१५ सालांतील गोष्ट असावी. छापखान्याची मुस्कटदाबी करणाऱ्या कायद्याच्या निषेधाची ती सभा होती. त्यांनीं अगदीं थोडा वेळ भाषण केलें आणि तेंहि इंग्रजींत.

सभा संपतांक्षणींच तेजबहादूर सप्रूंनीं व्यासपीठावर चढून सर्व लोकांसमक्ष त्यांना आलिंगन देऊन त्यांचें चुंबन घेतलें ! ! लज्जेनें नेहरू अगदीं चूर झाले !!! भाषणाचा आशय अथवा पद्धति चांगली होती म्हणून नव्हे, तर निव्वळ ते सभेत बोलले म्हणून !

## २३ : : नेहरू गांधीजींना भेटले.

१९१६ सालच्या नाताळांत लखनौ काँग्रसच्या अधिवेशनाचे वेळीं नेहरू गांधीजींना प्रथमच भेटले. दक्षिण आफ्रिकेंत गांधीजी धैर्यानें लढले असल्यामुळें सर्वांना त्यांच्याबद्दल आदर वाटत होता. त्यावेळच्या पुष्कळ तरुणांना ते दूर अंतरावर उभे आहेत, साधारण माणसापेक्षां निराळे आहेत, पण राजकारणी नाहींत असें वाटलें. काँग्रेसच्या अथवा देशाच्या राजकारणांत भाग घेण्यास त्यावेळीं ते मुळींच तयार नव्हते. दक्षिण आफ्रिकेचा प्रश्न बरा कीं आपण बरे ही त्यांची वृत्ति होती.

नंतर चंपारण्यांत त्यांनीं दाखविलेली हिम्मत आणि किसानांसाठीं मिळविलेलें यश ह्यामुळें नेहरूसारख्या तरुणांना उत्साहाचें भरतें आलें !


स्वत:ची कार्यपद्धति हिंदुस्थानांत लागू करण्यास ते तयार आहेत व ती येथें यशस्वी होईल याविषयीं नेहरूंसारख्या तरुणांची खात्री झाली ! !

## २४ : : नेहरूंचें लग्न व हिंदुस्थानचें नंदनवन !

नेहरूंचें लग्न १९१६ सालीं दिल्ली शहरांत झालें. वसंतागम सूचित करणाऱ्या वसंतपंचमीचा तो दिवस होता. त्या वर्षीच्या उन्हाळ्यांतले कांहीं महिने त्यांनीं काश्मिरांत काढले. आपल्या कुटुंबियांना खालच्या खोऱ्यांत ठेवून नेहरू आणि त्यांचे एक चुलत भाऊ असे दोघे जण बरेच आठवडे डोंगरांतून हिंडत होते. त्यावेळीं ते 'लाडाख' घाटहि चढून गेले.

काश्मिरांतील उंच दऱ्याखोऱ्यांनीं त्यांच्या मनाला इतका कांहीं चटका लावला होता कीं लवकरच पुन्हां तेथें जाण्याचा यांनीं संकल्प केला. त्यांनीं किती वेळां बेत केले; प्रवासाच्या योजना आंखल्या; कुतूहलाचें स्थान बनलेल्या तिबेटांतल्या त्या मानससरोवराचें व शेजारच्या हिममय कैलासाचें दर्शन घेण्याचाहि त्यांचा बेत होता. त्याचा नुसता विचार आला तरी त्यांचें मन आनंदानें डुलूं लागे. परंतु बेत करून १८ वर्षें झालीं होतीं ते पूर्वीच्या ठिकाणींच होते. राजकारणाच्या व सार्वजनिक कामाच्या जाळ्यांत ते अधिकाधिकच गुंतत होते व पर्वत उल्लंघण्याच्या आणि समुद्रपार होण्याऐवजीं प्रवासाची हौस त्यांना तुरुंगाच्या वाऱ्यांनींच भागवावी लागे !

## २५ : : नेहरूंचे वडील जमिनीवर निजले !



१९१९ च्या प्रारंभीं गांधीजी एका जिवावरच्या दुखण्यांतून बचावले. रौलेट कायद्यास संमति देऊं नका अशी काकुळतीची विनंति आजारी असतांनाच त्यांनीं व्हाइसरॉयला केली होती. इतर विनंत्याप्रमाणेंच ह्याहि विनंतीची विल्हेवाट लागली, आणि जवळजवळ मोठ्या नाखुषीनेंच त्यांनीं आपल्या पहिल्या देशव्यापी चळवळीचें नेतृत्व स्वीकारलें. सत्याग्रह-सभा भरविण्याचा त्यांनीं उपक्रम सुरू

केला. त्यांतल्या सभासदानें रौलेट कायदा मोडण्याची प्रतिज्ञा करावयाची होती. थोडक्यांत म्हणजे जाणूनबुजून उघडपणें तुरुंगाचा मार्ग चोखाळावयाचा होता !

नेहरूंनीं ह्या सूचना वृत्तपत्रांत वाचल्या आणि त्यांना अतिशय समाधान वाटलें. त्यांच्या उत्साहाला भरती आली. सत्याग्रह-सभेचा तात्काळ सभासद होण्याचा विचार त्यांचे मनांत आला. कायदेभंग, तुरुंगवास वगैरे परिणामांची त्यांना दखल नव्हती, पण त्यांचे वडील ह्या कल्पनांच्या सर्वस्वी विरुद्ध होते ! त्यांच्यावर वडिलांचें अतोनात प्रेम होतें. प्रेमाचा बाजार त्यांनीं कधीं भरवला नाहीं, पण त्यांच्या संयमाच्या पापुद्र्याखालीं वात्सल्याचा खोल सांठा भरलेला होता ! ! मागाहून समजलें कीं प्रत्यक्ष अनुभव असावा म्हणून त्यांच्या वडिलांनीं जमिनीवर निजूनहि पाहिलें. त्यांना वाटे कीं तुरुंगांत नेहरूंना जमिनीवर निजावें लागणार !!!

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# २६ : : नेहरूंच्या मनाला मोठा धक्का बसला !

१९१९ च्या अखेरीस नेहरू रात्रीच्या गाडीनें अमृतसरहून दिल्लीला जात होते. ते शिरले तो डबा जवळजवळ भरलेला होता. वरचा एकच बिछाना रिकामा होता तो त्यांनीं पकडला. सकाळीं पाहतात तो त्यांच्या बरोबरीचे सर्व प्रवासी लष्करी अधिकारी असल्याचें आढळून आलें. एकमेकाशीं ते खडया आवाजांत बोलत असल्यामुळें नेहरूंना त्यांचें संभाषण ऐकण्यावांचून गत्यंतर नव्हते !

त्यांपैकीं एकजण मोठ्या दिमाखानें आणि उन्मत्तपणानें आपली बाजू मांडत होता. लवकरच त्यांना समजलें कीं, जालियनवाला बागेंतील वीर शिरोमणि, जनरल डायर ते हेच ! अमृतसरचे आपले अनुभव ते निवेदन करीत होते. त्यांनीं सांगितलें कीं, ‘सर्व शहर माझ्या मुठींत होतें. एकदां मनांत आलें कीं हें बंडखोर शहर धुळीस मिळवावें. पण म्हटलें जाऊ द्या आणि मग तो विचार सोडून दिला.’ हें संभाषण ऐकून व त्यांचा निष्ठुरपणा पाहून नेहरूंच्या मनाला धक्का बसला ! !

## २७ : : नेहरूंची हकालपट्टी झाली !

नेहरूंची आई व पत्नी आजारी होत्या, म्हणून १९२० च्या मे महिन्याच्या प्रारंभीं ते त्यांना घेऊन मसुरीला गेले. त्यांचे वडील एका मोठ्या राज्याच्या खटल्यांत गुंतले असून चित्तरंजनदास त्यांच्या विरुद्ध बाजूला होते ! नेहरू मसुरीला सव्हॉय हॉटेलांत उतरले. त्यावेळीं तेथें अफगाण व ब्रिटिश वकिलांत तहाच्या वाटाघाटी सुरू होत्या. अफगाण वकील सव्हॉय हॉटेलांतच उतरले होते. ते दूरदूरच राहात. एकीकडे भोजन करीत व सार्वजनिक दिवाणखान्यांत फिरकतहि नसत !

एके दिवशीं संध्याकाळीं पोलिस सुपरिंटेंडेंड अचानक त्यांच्या खोलीवर आले आणि स्थानिक सरकारकडून त्यांना आलेलें पत्र त्यांनीं नेहरूंना दाखविलें. त्यांत ते अफगाण वकिलातीशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवणार नाहींत असें त्यांच्याकडून लेखी लिहून घेण्यांत यावें असें लिहिलें होतें. लेखी लिहून देणें त्यांच्या स्वभावाविरुद्ध होतें म्हणून त्यांनी त्याला नकार दिला ! त्यामुळें त्यांचेवर हद्दपारीचा हुकूम बजाविण्यांत येऊन कांहीं तासांतच आजारी आईला व पत्नीला तेथेंच सोडून मसुरीहून मुक्काम हलवावा लागला.

## २८ : : मी हा असाच पुढें जात राहणार !



१९२१ जुलैच्या सुरुवातीची गोष्ट. नागपूर कॉंग्रेस आटोपून नेहरू नुकतेच अलाहाबादेला आले होते. कांहीं तरी भानगड उत्पन्न होण्याचा संभव आहे; तेव्हां ताबडतोब रायबरेलीस यावें, अशा मजकुराची तार त्यांना मिळाली.

दुसऱ्या दिवशीं नेहरू अलाहाबादेहून निघाले. थोड्या दिवसांपूर्वीं कांही किसान पुढाऱ्यांना पकडण्यांत आले असून त्यांना तेथल्याच तुरुंगांत अटकेंत ठेवण्यांत आलें आहे असें कळले. शेतकऱ्यांनीं रायबरेलीकडे मोर्चा फिरविला !

एका लहानशा नदीच्या पैलतीरावर शहराच्या सीमे-नजीकच्या किसानांच्या मुख्य जमावाला सैन्यानें रोखून

ठेवलें; तथापि कित्येक किसान इतर वाटांनीं शहरांत घुसले. स्टेशनवर येताक्षणींच नेहरूंना एकंदर परिस्थिति समजली, आणि जेथें शेतकरी व सैन्य तळ देऊन उभे होते, त्याच जागेकडे ते थेट निघाले. वाटेंतच डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें घाईघाईनें लिहिलेली चिठ्ठी त्यांना मिळाली. त्यांत त्यांना परत जाण्याविषयीं बजावलें होतें. त्याच कागदाच्या पाठीवर त्यांनीं उत्तर लिहिलें, "मला कोणत्या कायद्याच्या कलमाप्रमाणें मागें फिरण्याचा हुकूम देण्यांत येत आहे तें कळवीपर्यंत मी हा असाच पुढें जात राहणार!" नंतर फौजेनें त्यांना पुलाजवळ अडविलें. मग तेथल्या तेथेंच दोन हजार किसानांची सभा भरवून त्यांची भीति व चिंता दूर करण्याचा नेहरूंनीं यशस्वी प्रयत्न केला.

◆

अनुक्रम ३८११८
विभाग
क्रमांक ३७९
नों. दि.

वा. क्र. १०७८८
वि. ...

# २९ : नेहरू असहकारी झाले !

गांधीजींच्या चळवळीची व सत्याग्रहाची जी विशुद्ध व नैतिक बाजू, तिच्याविषयीं नेहरूंना अभिमान वाटे. अहिंसेवर परिस्थिति--निरपेक्ष व अविचल अशी निष्ठा त्यांनीं कधींच व्यक्त केली नव्हती, अथवा तिचा सर्व काळ स्वीकार करण्याचेंहि त्यांनीं ठरवलें नव्हतें. पण त्या तत्त्वाकडे ते अधिकाधिक आकर्षित होऊं लागले आपल्या देशाची सध्याची परिस्थिति व परंपरा लक्षांत घेतां अहिंसेचें धोरणच योग्य आहे अशीं त्यांची खात्री पटत चालली. राजकारण अध्यात्मपर बनवावें ही कल्पना त्यांना फार रम्य वाटली. हें तत्त्व नैतिक दृष्टचाच नव्हे तर व्यावहारिक राजकारणाच्या कसोटीला उतरण्याच्या दृष्टीनेंहि विशुद्ध आहे असें त्यांना वाटलें

शिवाय त्यांच्या नैतिक भावनेचेंहि त्यांपासून समाधान होतच होतें. हें वैयक्तिक शांतिसुख इतकें मोठें होतें कीं, चळवळ अपेशी होईल या विचारानेंहि त्यांत फारशी उणीव येत नव्हती. कारण अपयश हें सुद्धां अनित्यच नाहीं का? भगवद्गीतेंतील अध्यात्म त्यांना विशेष कळत नसलें तरी गांधीजींच्या आश्रमांत दर संध्याकाळीं म्हणण्यांत येणारा एक श्लोक नेहरूंना फारच आवडला होता. निवाऱ्याच्या जागी ठेवलेल्या दिव्याच्या ज्योतीप्रमाणें माणसानें शांत असावें व कर्मफलाची आकांक्षा न बाळगतां कार्य करीत राहावें.